अर्धसाप्ताहिक
# ब्रम्हपुरी समाचार
संपादक
अशोक भैया
RNI No. MAHMUL/2016/69789
E-Mail ID : bramhapurisamachar@gmail.com
Postal Regd. No. G2/47/CHD-283/2023-25
गुरूवार, दि. १९ जून २०२५ वर्ष १० वे अंक ४५ वा ब्रम्हपुरी पाने ६ किंमत २ रूपये

## स्वातंत्र्याच्या ७७ वर्षानंतरही अधिकृत रस्ता नसलेलं गावः लाडज

### अजूनही नदीपात्रातूनच करावा लागतो प्रवास



ब्रम्हपुरी/महेश पिलारे

भारत देशाला स्वातंत्र्य मिळून ७७ वर्ष उलटले, देश विकसनशीलते कडून विकसीत झाला. परंतु ब्रम्हपुरी तालुक्यातील एक गाव अजूनही विकासाच्या प्रवाहापासून काही अंतरावरच आहे. रस्ते, पाणी, वीज, आणि राहण्यासाठी पक्की घरे ही जरी विकसीत गावाची लक्षणे असली तरी यातील एक जरी सोय नसेल तर त्या गावाचा विकास झाला असे म्हणता येणार नाही. गावा-गावांना जोडणारा दुवा म्हणजे रस्ता होय, परंतु एखाद्या गावाला जाण्यासाठी अधिकृत रस्ताच नसेल तर.. याची कल्पनाच न केलेली बरी. असेच अधिकृत रस्ता नसलेले ब्रम्हपुरी तालुक्यातील गाव म्हणजे लाडज. या गावाला जाण्यासाठी अद्यापही कुठलाही अधिकृत रस्ता नाही. होय, हे वास्तव आहे लाडज या गावाचे.

ब्रम्हपुरी शहरापासून अंदाजे १४ कि.मी. अंतरावर लाडज हे गाव आहे. हे गाव वैनगंगा नदीच्या चहूबाजूंनी वेढलेल आहे. त्यामुळे या लाडज गावाला बेटाचे स्वरूप प्राप्त झाले आहे. गावाला बेटाचे स्वरूप प्राप्त झाल्यामुळे येथील जमीन कसदार आहे. त्यामुळे लाडज, चिखलगाव, सुरबोडी, पिंपळगाव, सोंद्री येथील शेतकऱ्यांची ९६७ हेक्टर शेतजमीन आहे. सदर गावाला चहूबाजूंनी वैनगंगा नदीचा वेढा असल्यामुळे सदर गावात ये-जा करण्यासाठी पावसाळ्यात नावे शिवाय पर्याय नाही. नदीपात्रातील पाण्याचा प्रवाह कमी झाल्यानंतरच पर्यायी मार्ग म्हणून गावकरी पात्रातून आवागमन करतात. परंतु गावाला जाण्यासाठी अद्यापही अधिकृत रस्ता नाही. त्यामुळे पावसाळ्यात लाडज व चिखलगांव वासीयांना नदीपात्रातून जीवघेणा प्रवास करावा लागतो.


दरवर्षी पावसाळ्यात लाडज हे गाव वैनगंगेच्या पाण्याने वेढलेले असते. या पूर्वी नदी पात्रातून आवागमन करीत असताना अनेक ग्रामस्थांना आपले प्राण गमवावे लागल्याच्या घटना घडल्या. या रस्त्याच्या समस्येवर कायमचा तोडगा काढण्यासाठी लाडज व चिखलगांव वासीयांनी प्रशासनाला अनेक पत्रव्यवहार केले. आंदोलनाचा पवित्रा उचलला, निवडणुकींवर बहिष्कार

(उर्वरित पान क्र. ६ वर)

## काय सांगताय... घरात १ लाईट, १ पंखा असतांना बिल ७७ हजार!

ब्रम्हपुरी/महेश पिलारे

अनेकदा महावितरणच्या माध्यमातून ग्राहकांना अव्वाच्या सव्वा बिल आल्याच्या अनेक घटना समोर आलेल्या आहेत. ब्रम्हपुरी तालुक्यातील तोरगांव खुर्द येथे असाच काहीसा प्रकार घडला आहे. एका नागरिकाला एक महिन्याचे विजेचे बिल तब्बल ७७ हजार रुपयांपेक्षा जास्त आले आहे. हा कुणी कारखानदार किंवा हॉटेल व्यावसायिक नाही तर मजूरी करणारा सर्वसामान्य ग्रामस्थ आहे. बिल पाहिल्यानंतर मजूरी करणाऱ्या ग्रामस्थाने देखील डोक्यावर हात मारुन घेतला आहे. वीज प्रत्येकाच्या जीवनाचा



वीज पुरवठा देयक माहे: JUN-2025

Website :www.mahadiscom.in
GSTIN of MSEDCL 27AAECM2933K1ZB
BILL NO.(GGN): 000002916134588
HSN code 27160000

ग्राहक क्रमांक: 465260516496
SHRI SHRIKRUSHNA PANDURANG ALONE
TORGAON KH BRAMHAPURI TORGAON KH 441206
मोबाइल/ इमेल: 91******24/

देयक दिनांक: 14-JUN-25
देयक रक्कम रु: 76,180.00
देय दिनांक: 04-JUL-25
या तारखे नंतर भरल्यास: 77,130.00

बिलींग युनिट: 4331 :BRAMHAPURI S/DN.
दर संकेत: 090 /LT I Res 1-Phase
पोल नं: 00000000
पी.सी./चक्र+मार्ग-क्रम/डि.टी.सी.: 1 / 01-0537-0100 /4331537
मिटर क्रमांक: 08200634177
रिडिंग ग्रुप: I1

पुरवठा दिनांक: 05-Feb-2010
मंजुर भार: 0.26 KW
सुरक्षा ठेव जमा(रु): 15.00
चालु रिडिंग दिनांक: 12-JUN-25
मागील रिडिंग दिनांक: 10-MAY-25

| चालु रिडिंग | मागील रिडिंग | गुणक अवयव | युनिट | समा. युनिट | एकूण |
|---|---|---|---|---|---|
| 7727 | 3869 | 01 | 3858 | 0 | 3858 |

NORMAL
Bill Period: 1.1 Month(s) /

Scan this QR Code with BHIM App for UPI Payment

QR कोडद्वारे भरणा केल्यास, भरणा दिनांकानुसार लागू असलेली तत्पर देयक भरणा सूट किवा विलंब आकार पुढील देयकात समाविष्ट करण्यात येईल.

अविभाज्य भाग बनलेली आहे. अनेक कामे विजेवर केली जात असल्याने वीज ही आवश्यक असते. यासाठी ग्राहक दर महिन्याला महावितरणला बिल अदा करत असतात. मात्र महावितरणकडून चुकीचे बिल पाठवणे, अवाजवी मीटर रीडिंग, मनमानी पद्धतीने लाईट बिल आकारणी करणे अशा अनेक घटनांमुळे ग्राहक त्रस्त आहेत. अशातच असाच काहीसा फटका ब्रम्हपुरी तालुक्यातील तोरगांव खुर्द येथील वास्तव्य करणाऱ्या सर्वसामान्य कुटूंबातील मजूराला दिला आहे. या सर्वसामान्य मजूराच्या घरात एक लाईट आणि एक पंखा आहे असे असताना देखील त्यांना वीज महावितरणे त्यांना एक महिन्याचे तब्बल ७७ हजार १३० रुपयांचे बिल पाठवले आहे. एवढ्या मोठ्या रकमेचे बिल पाहून त्यांना मोठा धक्का बसला.

अधिक माहिती अशी आहे की, ब्रम्हपुरी तालुक्यातील तोरगांव खुर्द येथे राहणारे नागेश्वर अलोने हा मजूरीचा काम करतो. घरात रहाणारे तिघेच जण. त्यातही नागेश्वर हा मजूरीवरच अवलंबून असून त्यावर कुटुंबियाचा उदरनिर्वाह चालतो. घरात एक लाईट आणि एक पंखा आहे. दर महिन्याकाठी अलोने यांना अंदाजे ३०० ते ६०० रूपयांदरम्यान विज देयक येत असते. असे असताना देखील महावितरणे त्यांना एक महिन्याचे तब्बल ७७ हजार १३० रुपयांचे बिल पाठवले आहे. एवढ्या मोठ्या रकमेचे बिल पाहून त्यांना मोठा धक्का बसला. रोजंदारीवर काम करून हातावर आणणे आणि पानावर खाने ही त्याची नित्याची दिनचर्या असणाऱ्याला महावितरणने अव्वाच्या सव्वा बिल पाठवून झटका दिला आहे. त्यातल्या त्यात महागाईमुळे उदरनिर्वाहाचा प्रश्न निर्माण झाला आहे. त्यांनी दर महिन्याला बील भरलेले असताना, माझी कोणतीही थकबाकी नसताना मला ७७ हजार रुपयांचे बील का देण्यात आले? हजारो रूपयांचे विद्युत देयक भरण्याच्या चिंतेने नागेश्वर अलोने ग्रासले आहे.

**महावितरणची कमालच....**

माझ्याकडे कोणतीही थकबाकी नाही, मी दर महिन्याला विजेचे बिल भरलेले असताना देखील मला महावितरण कार्यालयाने ७७ हजार रुपयाचे देयक पाठविले. देयक आल्याचे पाहून मला धक्काच बसल्याचे या व्यक्तीने आमच्या प्रतिनिधींना सांगितले. मी गरीब व्यक्ती आहे, माझी थकबाकी नसताना इतके बिल कसे आणि का भरु असा सवाल नागेश्वर अलोने यांनी केला आहे.



## संपादकीय...

# आणखी एक युध्द

अखेर इस्रायलने इराणवर हल्ला केलाच, इस्रायलने इराणच्या 'अणुकार्यक्रम तळांवर' अचानक हल्ला करून सर्वांना केवळ आश्चर्यचकितच केले नाही, तर संपूर्ण टापूला अनिश्चिततेच्या भोवऱ्यात टाकले आहे. हा हल्ला इतका मोठा होता की, त्वरित प्रत्युत्तर देण्याची इराणची स्थिती राहिली नाही. इराणने हमास या दहशतवादी गटाच्या माध्यमातून इस्रायलमध्ये पेटवलेली ठिणगी आता पश्चिम आशियाला पेटवत आहे. इस्त्रायल आणि इराणमधील तणाव इतका शिगेला पोहोचला आहे की, इस्रायलने हल्ल्यांदरम्यान इराणचे अणुशास्त्रज्ञ, लष्करी अधिकारी, क्षेपणास्त्र डेपो, हवाई संरक्षण प्रणालीसह अनेक अणु केंद्रांना लक्ष्य केले आहे. आता इराणही बदला घेत आहे.

इस्रायलच्या या 'ऑपरेशन रायझिंग लायन'नंतर, अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी अणुकराराबद्दल ज्याप्रकारे धमकीच्या स्वरात इराणला इशारा दिला आहे, त्यावरून या इस्रायली कारवाईत अमेरिकेचा सहभाग स्पष्ट होतो. इस्रायली बॉम्बर्सनी कतारमधील अमेरिकन लष्करी तळावरून इंधन भरले आहे, यावरूनही अमेरिकेचा सहभाग दिसून येतो. अमेरिका कदाचित मानत असेल की, इस्त्रायलवर केलेल्या हल्ल्याची त्यांना चिंता आहे; परंतु सत्य हे आहे की, राष्ट्राध्यक्ष ट्रम्प यांनाही तेच हवे आहे जे इस्त्रायलला हवे होते. इराणने त्या बदल्यात कोणतेही पाऊल उचलले, तरी त्याचा थेट आणि अप्रत्यक्षपणे जगावर विनाशकारी परिणाम होईल. अमेरिका इस्रायलसोबत उभी आहे, तशीच इराणही एकटी नाही; चीन आणि रशियाही त्याच्यासोबत आहेत. अनिश्चितता आणि लष्करी संघर्षाने भरलेल्या जगात, दोन सत्तेचे ध्रुव आमनेसामने येत आहेत. युक्रेन-रशियामधील युद्ध आणि इस्रायल-इराणमधील तणावातही अशीच परिस्थिती निर्माण होत आहे. इराण आपल्या अणुकार्यक्रमावर ठाम आहे, तर अमेरिका इराणला तसे करू न देण्यावर ठाम आहे. इराण म्हणत आहे की, त्यांचा अणुकार्यक्रम केवळ शांततापूर्ण हेतूंसाठी आहे, परंतु अणुऊर्जा वॉचडॉग (आंतरराष्ट्रीय अणुऊर्जा एजन्सी) हा दावा फेटाळत आहे. इस्रायलने असाही आरोप केला आहे की, इराण अणुशस्त्रे बनवत आहे. ही भीती निराधार म्हणता येणार नाही. इराणने अनेक वेळा म्हटले आहे की, ते जगाच्या नकाशावरून इस्रायलचे नामोनिशान मिटवेल. अमेरिका आणि इस्त्रायल इराणला अणुशस्त्रे बनवण्यापासून रोखण्याचा प्रयत्न करत आहेत. या आठवड्यात, दोन दशकांत प्रथमच इराणला अणुप्रसार नियमांचे उल्लंघन केल्याबद्दल औपचारिकपणे दोषी घोषित करण्यात आले आहे. इस्रायल बऱ्याच काळापासून म्हणत आहे की, इराणला कोणत्याही परिस्थितीत अणुशस्त्रे विकसित करण्यापासून रोखले पाहिजे आणि आवश्यक असल्यास, बळाचा वापर करण्यास मागेपुढे पाहणार नाही. इराण अशा स्थितीत पोहोचला आहे की, तो काही दिवसांत १५ अणुबॉम्ब बनवू शकतो. इस्रायलने केलेल्या या आरोपांची पुष्टी झालेली नाही. इस्रायलने यापूर्वी बंकरमध्ये असलेल्या इराणच्या सर्वांत मोठ्या आणि गुप्त अणुसंवर्धन केंद्रावर सायबर हल्ले आणि बॉम्बस्फोट केले आहेत. यावेळी मात्र इस्त्रायलच्या हल्ल्याची व्याप्ती खूपच विनाशकारी आहे. इराणचे राष्ट्राध्यक्ष मसूद पेझेश्कियान यांनी म्हटले आहे की, इराणची प्रतिक्रिया इतकी भयानक असेल की इस्रायलला त्याचा पश्चात्ताप होईल.

मोठा प्रश्न असा आहे की, जर इस्रायल आणि इराणमधील युद्ध वाढले, तर जगावर आणि भारतावर काय परिणाम होईल? जागतिक व्यापाराचा एक प्रमुख मार्ग मध्य पूर्वेतून आहे. इराणच्या युद्धाचा या व्यापार मार्गावर परिणाम होईल, ज्यामुळे ऊर्जा आणि अन्न पुरवठा खंडित होईल. याचा अर्थ असा की, सामान्य माणसासाठी जागतिक स्तरावर महागाई वाढेल. भारताच्या ऊर्जा पुरवठ्यावरही परिणाम होऊ शकतो. ऑपरेशन सिंदूरदरम्यान इस्रायलने भारताच्या स्वसंरक्षणाच्या अधिकाराचे उघडपणे समर्थन केले, तर इराण मध्यस्थीबाबत बोलला. भारताचे इस्रायल आणि इराण दोघांशीही चांगले संबंध असले, तरी इस्रायलचा वरचष्मा आहे. भारताची चाबहारमध्ये मोठी गुंतवणूक आहे आणि इस्रायलच्या तेल आणि इंधनाचा मोठा खरेदीदार आहे. असे असूनही, इराण भारताच्या बाजूने पाकिस्तान पुरस्कृत दहशतवादाविरुद्ध उघडपणे भूमिका घेत नाही. भारताने इस्रायल आणि इराणला हा प्रश्न शांततेने सोडवण्याचा सल्ला दिला आहे. पहिल्या हल्ल्याच्या काही तासांतच आंतरराष्ट्रीय बाजारात तेलाच्या किमती १३ टक्क्यांनी वाढल्या, यावरून या युद्धाचे जागतिक दुष्परिणाम दिसून येतात, आता सर्वांत मोठा प्रश्न असा आहे की, इराणच्या प्रत्युत्तराचे स्वरूप आणि त्याची व्याप्ती किती मोठी असेल? ते केवळ इस्रायलला लक्ष्य करून बदला घेईल की, पश्चिम आशिया आणि आखाती प्रदेशात असलेल्या अमेरिकन लष्करी तळांनाही लक्ष्य करेल की, होर्मुझच्या सामुद्रधुनीलाही लक्ष्य करेल?

## BRAMHAPURI URBAN CO-OP BANK LTD BRAMHAPURI

**HEAD OFFICE : "CHAYADEEP COMPLEX, INDIRA GANDHI CHOWK, BRAMHAPURI**
**DIST- CHANDRAPUR, 441206**

(Section 29 of Banking Regulation Act, 1949, as applicable to Co-operative Societies)

### FORM 'A'

### BALANCE SHEET As on 31st March 2025

| | Schedule | As on 31.03.2025 (Current Year) | As on 31.03.2024 (Previous Year) |
|---|---|---|---|
| **CAPITAL & LIABILITIES** | | | |
| Capital | 1 | 34940400.00 | 31891775.00 |
| Reserves & Surplus | 2 | 52728559.20 | 52098925.02 |
| Deposits | 3 | 793579623.97 | 692270968.69 |
| Borrowing-long term (subordinate) Deposit | 4 | 0.00 | 0.00 |
| Other liabilities & provisions | 5 | 72305077.53 | 61858162.03 |
| **Total** | | **953553660.70** | **838119830.74** |
| **ASSETS** | | | |
| Cash & Balance with Reserve Bank of India | 6 | 6080329.00 | 8575560.00 |
| Balances with banks and money at call & short notice | 7 | 113890142.60 | 85770803.28 |
| Investments | 8 | 274242119.47 | 273893342.54 |
| Advances | 9 | 525738780.14 | 437037648.85 |
| Fixed Assets | 10 | 15823394.60 | 15807039.68 |
| Other Assets | 11 | 17778894.89 | 17035436.39 |
| **Total** | | **953553660.70** | **838119830.74** |
| Contingent Liabilities/DEAF Account | 12 | 117655.00 | 0.00 |

FOR- BRAMHAPURI URBAN CO-OP BANK LTD BRAMHAPURI

C.E.O. CHAIRMAN DIRECTOR DIRECTOR VICE-CHAIRMAN

For Bhutada jain & Gatagat
CHARTERED ACCOUNTANTS

Rajesh Gatagat
Partner
M. No. 118814

AS PER OUR REPORT OF EVEN DATE ATTACHED

### FORM 'B'

### FORM OF PROFIT & LOSS ACCOUNT FOR THE YEAR ENDED 31st MARCH, 2025

| | Schedule | As on 31.03.2025 (Current Year) | As on 31.03.2024 (Privious Year) |
|---|---|---|---|
| **I. Income** | | | |
| Interest earned | 13 | 73171535.68 | 64791496.54 |
| other Income | 14 | 3994358.28 | 2856486.62 |
| | | **77165893.96** | **67647983.16** |
| **II. Expenditure** | | | |
| Interest Expended | 15 | 45621255.82 | 38164081.10 |
| Operating Expenses | 16 | 29065981.65 | 24735062.75 |
| Provisions & Contingencies | | | |
| | | **74687237.47** | **62899143.85** |
| **III. Profit/Loss** | | | |
| Net Profit / Loss (-) for the year | | 2478656.49 | 4748839.31 |
| Profit / loss (-) brought forward | | | |
| | | **2478656.49** | **4748839.31** |
| **IV. Appropriations** | | | |
| Transfer to statutory reserves | | 0.00 | 0.00 |
| Transfer to other reseves (BDDR) | | 0.00 | 0.00 |
| Transfer to Government | | 0.00 | 0.00 |
| Transfer to Income Tax Paid | | 0.00 | 0.00 |
| Proposed dividend | | 0.00 | 0.00 |
| Balance carried over to Balance sheet | | **2478656.49** | **4748839.31** |

FOR- BRAMHAPURI URBAN CO-OP BANK LTD BRAMHAPURI

C.E.O. CHAIRMAN DIRECTOR DIRECTOR VICE-CHAIRMAN

For Bhutada jain & Gatagat
CHARTERED ACCOUNTANTS

Rajesh Gatagat
Partner
M. No. 118814

# INDEPENDENT AUDITOR'S REPORT

To,

THE MEMBERS,
BRAMHAPURI URBAN CO-OPERATIVE BANK LTD
BRAMHAPURI

***Report On Financial Statements -***

We have audited the attached balance sheet of the ***BRAMHAPURI URBAN CO-OPERATIVE BANK LTD, BRAMHAPURI*** as at **31st March 2025**, and the Profit and Loss Account for the year ended on that date and a summary of significant accounting policies and other explanatory information and the Cash Flow Statement as on that date, incorporated in these financial statements along with H.O. & all the 4 branches audited by us for period 01.04.2024 to 31.03.2025.

**Management's Responsibility and those charged with Governance for the financial Statements -**

Management is responsible for the preparation of these financial statements in accordance with **Maharashtra State Co-operative societies Act 1960, Banking Regulation Act, 1949.** This responsibility includes the design, implementation and maintenance of internal control relevant to the preparation of the financial statements that are free from material misstatements, whether due to fraud or error. In preparing the financial statements, the management and Board of Directors are responsible for assessing the Bank's ability to continue as a going concern, disclosing, as applicable, matters related to going concern and using the going concern basis of accounting unless the management either intends to liquidate the Bank or to cease operations, or has no realistic alternative but to do so. The Board of Directors are also responsible for overseeing the Bank's financial reporting process.

**Auditor's Responsibility -**

1. Our responsibility is to express an opinion on these financial statement prepared as per MCS ACT & BR Act based on our audit. We conducted our audit in accordance with "standards on auditing" issued by the "Institute of Chartered Accountants of India" and MCS ACT, BR ACT and RBI Guidelines. Those standards require that we comply with ethical requirements and plan and perform the audit to obtain reasonable assurance about whether the financial statements are free from material misstatements, whether due to fraud or error.
2. An audit involves performing procedures to obtain audit evidence about the amounts and disclosures in the financial statements. The procedures selected depend on auditor's judgment, including the assessment of the risk of material misstatement of the financial statements, whether due to fraud or error. In making those risk assessments, the auditor considers internal control relevant to bank's preparation and fair presentation of the financial statements to design audit procedures that are appropriate in the circumstances. An audit also includes evaluating the appropriateness of accounting policies used and the reasonableness of the accounting estimates made by management, as well as evaluating the overall presentation of the financial statements.
3. We believe that audit evidence we have obtained is sufficient and appropriate to provide a basis for our audit opinion.

**Emphasis of Matters -**

Without qualifying our opinion, we bring to your attention the following:

1. The bank has, represented that all documentation in respect of the advances outstanding is being maintained properly and no further impact is expected on the financial performance of the bank for the year ended 31st March 2025, other than those included in the trial balance of the bank.
2. The financial performance of the bank has been thus prepared and presented by the bank and audited by us in the aforesaid conditions.
3. Accounting of certain items like locker rent, dividend on Investment, commission on guarantees, incidental charges, service charges & processing fees is done in the year of receipt, thereby deviating the principles of the Accounting Standard 9 on **"Revenue Recognition"** according to which income relating to current year should be recognized on accrual basis if there is no uncertainty regarding the ultimate collectability and measurability.

However, our opinion is not modified in respect of above matters.

**Key Audit Matters**

Key Audit Matters (KAM) are those matters, in our professional judgement were amongst the most significant matters in our audit of Financial Statements for the year ended 31st March 2025. These matters were addressed in the context of our audit of Financial Statements as a whole and in forming our opinion there on, for which we do not provide a separate opinion on these matters. We have determined these matters described below to be KAM to be communicated in our report. Audit procedures performed by us in respect of KAM were designed after considering the assessment of risk of material misstatement of Financial Statements. The audit procedures performed by us in general as well as the audit procedures designed and performed to address the KAM, provide the basis for our audit opinion on accompanying Financial Statements.

**Opinion -**

**We have observed that-**

Subject to our observations above, in over opinion as shown by the books of the bank, and to the best of our information and according to the explanations given to us, We further report that in view of above read with Appendix - I & Appendix - II forming part of this statutory Audit report and also subject to the remarks of our detailed Audit memorandum Part A, B, & C, Form 1 & 7 and LFAR along with their annexures with even date, we are of the opinion that said accounts give a true and fair view in conformity with accounting principles generally accepted in India.

1) In case of the balance sheet of state of affairs of the Bank as at 31st March 2025.
2) In case of the Profit & Loss Statement, of the Profit for the year ended on that date: and
3) In the case of cash flow statement, of the cash flows for the year ended on that date.

**Report on Other Legal & Regulatory Requirements**

1. The Balance Sheet and Profit & Loss Account have been drawn up in accordance with the provisions of section 29 of Banking Regulation Act, 1949 RBI Direction read with the provisions of MSC Act, 1960 and MCS Rules, 1961 (Forms 'A' and 'B' respectively of the Third Schedule to the Banking Regulation Act, 1949).
2. We report that,
   Subject to the limitations of audit indicated in paragraph 1 to 5 above and as required by the Maharashtra State Co-operative Societies Act, 1960 and Banking Regulation Act 1949 and subject to the limitations of disclosure required therein.
3. We have obtained all the information and explanations, which to the best of our knowledge and belief, were necessary for the purposes of our audit and have found them to be satisfactory.
4. The transactions of the bank, which have come to our notice have been, in our opinion, within the powers of the bank except as mentioned in the Head Office Memorandum and Serious irregularities forming part of Head Office Memorandum.
5. The details are required by the Rule 69 (6) of Maharashtra Co-operative Societies Rules 1961 are given in the audit memorandum.
6. In our opinion, the balance Sheet, Profit and Loss Account complies with the applicable Accounting Standards subject to those mentioned above except AS-6, AS-10 & AS-22.
7. The appointment of Auditor is made by Bank Management under Maharashtra State Co-operative Societies Act 1960 and approval from RBI as per RBI Circular dated 27.04.2021.
8. We further report that,
   i. The Balance Sheet and Profit and Loss Account dealt with by this report, are in agreement with the books of account.
   ii. In our opinion, proper books of account as required by law have been kept by the Bank so far as appears form our examination of those books.
   iii. The reports on the accounts of the branches audited by us have been dealt with in preparing our report in the manner considered necessary by us.

The bank has been awarded **"A"** Audit Classification for the financial year 2024-2025.

Date : 01/06/2025
Place : Nagpur

SEAL

For Bhutada jain & Gatagat
CHARTERED ACCOUNTANTS
FRN 126067W

Rajesh Gatagat
(Partner)
MRN : 118814
UDIN : 25118814BMLDCT6726

# ने.हि. महाविद्यालयात एनसीसी कॅडेट्सचा प्रेरणादायी सत्कार समारंभ



ब्रम्हपुरी/का.प्र.

नेवजाबाई हितकारिणी महाविद्यालय, ब्रम्हपुरी येथील राष्ट्रीय कैडेट कोर (NCC) (आर्मी विंग SD/SW) च्या माजी कॅडेट्सच्या गौरवासाठी एक प्रेरणादायी सत्कार समारंभ नुकताच महाविद्यालयात उत्साहात पार पडला. या कार्यक्रमाचे आयोजन २० महाराष्ट्र बटालियन एनसीसी नागपूरशी संलग्न ने . हि. कॉलेज, ब्रम्हपुरीच्या एनसीसी युनिटतर्फे करण्यात आले होते.

या समारंभाचे अध्यक्ष महाविद्यालयाचे कार्यकारी प्राचार्य डॉ. एस. एम. शेकोकार होते. त्यानी सर्व कैडेट्सला शुभेच्छा दिल्या. प्रमुख पाहुणे म्हणून एन.बी.एच. एज्युकेशन सोसायटीचे सचिव अशोकजी भैया यांनी विशेष उपस्थिती दर्शवली आणि सर्व कैडेट्स चे अभिनंदन आणि कौतुक केले. या कार्यक्रमात मेजर विनोद नरड, कॅप्टन अभिजित एस. परकरवार, कैप्टन कुलजीत कौर गिल आणि पर्यवेक्षक प्रा. आनंद भोयर हे मान्यवर उपस्थित होते.

कार्यक्रमामध्ये एक्स कैडेट प्रशांत कामडी, एक्स कैडेट रोहित शिगुलवार, एक्स. कैडेट धीरज घुबडे, एक्स कैडेट जयंत निकोडे, एक्स कैडेट प्रफुल्ल मोहूर्ले (अग्निवीर) आणि एक्स कैडेट रबुश लांबाडे (पोलीस) या सर्व कॅडेट्सचा सन्मान आणि सत्कार करण्यात आला. या सर्व कॅडेट्सनी शिस्तबद्धता, समर्पण आणि परिश्रमाच्या बळावर देशसेवेसाठी आपले पाऊल पुढे टाकले आहे.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक कॅप्टन अभिजित एस. परकरवार यांनी केले. कार्यक्रमाला महाविद्यालयातील सर्व एनसीसी कॅडेट व प्राध्यापक उपस्थित होते.

# निरंकारी स्केटिंग अकादमीच्या विद्यार्थ्यांची भरारी



ब्रम्हपुरी/का.प्र.

नुकतेच नागपूर येथे पार पडलेल्या भारत सुपर स्केटिंग स्पर्धेत ब्रह्मपुरी येथील निरंकारी स्केटिंग अकादमीच्या विद्यार्थ्यांनी उत्कृष्ट कामगिरी करत तिसऱ्या क्रमांकाची ट्रॉफी आपल्या नावावर केली आहे.

या स्पर्धेत देशभरातील २० राज्यांमधून संघांनी सहभाग घेतला होता. या स्पर्धेत निरंकारी स्केटिंग अकादमीच्या विद्यार्थ्यांनी यशस्वी कामगिरीत करीत सिल्व्हर व कॉपर (ब्राँझ) पदक पटकावले. स्पर्धेत पार्थ प्रशांत झोडे, सर्वेश श्रीकांत थावरे, जयेश विनय बाळबुध्दे, नकुल संदीप अष्टिकर यांनी सिल्व्हर पदक, तर स्मित रमाकांत अंडेलकर व वंश श्रीकांत थावरे यांनी ब्राँझ पदक जिंकले.

स्पर्धेला मुख्य अतिथी म्हणून साचिन आमीन (President, MARSC) व शशिकांत मोर (Secretary, RSCFI) हे उपस्थित होते. विद्यार्थ्यांच्या यशाबद्दल सर्व विद्यार्थ्यांचे त्यांची प्रशिक्षिका रेशमा निरंकारी व ब्रह्मपुरी शहरातील नागरिकांनी अभिनंदन करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या आहेत.

# आगामी न.प. निवडणुकीसाठी नवीन मतदारांनी नोंदणी करा

## भाजयुमोचे अध्यक्ष प्रा.सुयोग बाळबुध्दे यांना आवाहन



ब्रह्मपुरी/का.प्र.

येत्या काही दिवसात ब्रह्मपुरी नगर परिषदेच्या निवडणुका होऊ घातल्या आहेत. निवडणुका तोंडावर असतांना निवडणूक आयोगाने नवीन मतदार नोंदणी सुरू केली आहे. याच पारश्वभूमीवर भारतीय जनता युवा मोर्चा ब्रह्मपुरी च्या वतीने ब्रह्मपुरीचे माजी आमदार प्रा. अतुल देशकर यांच्या मार्गदर्शनाखाली युवा नेता प्रा. सुयोग बाळबुधे यांनी नवीन मतदारांनी नाव नोंदवून लोकशाही प्रक्रियेत सहभागी व्हावे, असे आवाहन केले आहे.

प्रा. बाळबुधे म्हणाले की, १८ वर्षांवरील सर्व तरुणांनी आपला मतदार नांव नोंदवणे गरजेचे असून त्याचा वापर योग्य उमेदवार निवडण्यासाठी करावा. मतदार नोंदणी हा एक नागरिकाचा मूलभूत अधिकार असून त्याद्वारे जनभावना व प्रश्नांवरील भूमिका व्यक्त करता येते, असे त्यांनी नमूद केले. माजी आमदार प्रा. देशकर यांच्या मार्गदर्शनाखाली मतदार नोंदणीचे काम सुरू असून अधिकाधिक तरुणांनी त्याचा लाभ घ्यावा, असेही त्यांनी म्हटले. मतदार नोंदणी करिता ९८२३३३९७८८ या मोबाइल क्रमांकावर संपर्क साधण्याचे आवाहन प्रा. सुयोग बाळबुधे यांनी केले आहे.

- ब्रम्हपुरी समाचारमध्ये जाहिरात प्रसिध्दीसाठी संपर्क करा -
महेश पिलारे मो. 9503100964
प्रा. विजय मुडे सर मो. 8275715315

Disclosure norms in terms of RBI Circular Dt, 30th October 2002
Name of the Bank - Bramhapuri Urban Co-Op. Bank Ltd.
Tah. Bramhapuri Dist. Chandrapur

| S.No. | Particular | 31.03.2024 | 31.03.2025 |
|---|---|---|---|
| 1) | **Movement of CRAR** | | |
| a. | Capital Tier I | 663.11 | 687.08 |
| b. | Capital Tier II | 96.17 | 98.39 |
| c. | Total of Tier I and Tier II Capital | 759.28 | 785.47 |
| d. | Total Risk Weighted Assets | 4131.39 | 5464.54 |
| e. | Capital to Risk Assets Ratio | 18.38% | 14.37% |
| 2) | **Investments** | | |
| a. | Face Value | 2255.00 | 2125.00 |
| b. | Book Value | 2203.67 | 2083.03 |
| 3) | **Advances Against Sensitive Sector** | - | - |
| 4) | **Advances Against Shares & Debentures** | - | - |
| 5) | **Advances to Directors, their relatives, Companies, firms in which they are interested outstanding at the end of the year** | 44.43 | 21.77 |
| 6) | **Average Cost of Deposit** | 5.85 | 6.09 |
| 7) | **NPAs** | | |
| a. | Gross NPAs | 217.52 | 312.49 |
| | Gross NPA% | 4.98% | 5.94% |
| b. | Net NPAs | 0.00 | 62.89 |
| | Net NPA% | 0.00% | 1.26% |
| 8) | **Movement in NPAs** | | |
| | Gross NPAs | | |
| a. | At the beginning of the year | 232.46 | 217.52 |
| b. | At the end of the year | 217.52 | 312.49 |
| 9) | **Profitability :** | | |
| a. | Interest income as a percentage of working funds | 7.81% | 7.75% |
| b. | Non-interest income as a percentage of working funds | 0.34% | 0.42% |
| c. | Operating profit as a percentage of working funds | 0.94% | 0.63% |
| d. | Return on Assets | 0.61 | 0.28 |
| e. | Business (Deposits + Advances) per employee | 342.21 | 425.59 |
| f. | Profit per employee | 1.44 | 0.79 |
| 10) | **Provisions made towards :** | | |
| a. | NPAs | 0.00 | 20.00 |
| b. | Depreciation in Investments | 5.00 | 0.00 |
| 11) | **Movement in Provisions :** | | |
| a. | Towards NPA | 230.06 | 249.60 |
| b. | Towards depreciation on investment | 24.00 | 24.00 |
| c. | Standard Assets | 33.50 | 33.50 |
| 12) | **foreign Currency Assets & Liabilities** | - | - |
| 13) | **DICGC Premium paid upto** | Sep.2024 | Sep. 2025 |
| 14) | **Penalty impose by RBI** | Nil | Nil |

N.B.H. Education Society's

## SHANTABAI BHAIYA MAHILA MAHAVIDYALAYA

BRAMHAPURI, DISTT. CHANDRAPUR (M.S.)

## Walk-in-Interview for Contributory Lecturers

(For No-Grant Basis) For session 2025-26

**Attend the Walk-in-Interview for CHB along with Marklists, Certificates and relevant documents.**

| Subject | No.of Posts | Date of Interview | Subject | No.of Posts | Date of Interview |
|---|---|---|---|---|---|
| Physics | 04 | Dt. 27/06/2025 at 11.00 am | Marathi | 04 | Dt. 28/06/2025 at 11.00 am |
| Mathematics | 04 | | English | 04 | |
| Chemistry | 04 | | Economics | 04 | |
| Zoology | 04 | | History | 04 | |
| Botany | 02 | | Sociology | 04 | |
| | | | Physical Education | 01 | |
| | | | Home Economics | 04 | |
| | | | Pol. Science | 04 | |
| | | | Geography | 04 | |

ADMISSION OPEN

- B.Sc. I, II, III (Physics, Chemistry, Maths, Zoology, Botany
- B.A. I, II, III (ELT, MLT, Geography, Home Eco., Pol. Science, Economics, History & Sociology)

Smt. Snehalatabai K. Bhaiya, President
Shri. Ashok K. Bhaiya, Secretary
Dr. M.S. Warbhe, Principal

# 'मिशन लाईफ-पर्यावरणासाठी जीवनशैली' कार्यक्रम

## ने.हि. महाविद्यालयातील एनसीसी गर्ल्स युनिटतर्फे आयोजन



ब्रम्हपुरी/का.प्र.

ने.ही. महाविद्यालय ब्रम्हपुरी येथील ३ महाराष्ट्र गर्ल्स एनसीसी युनिट तर्फे 'मिशन लाइफ – पर्यावरणासाठी जीवनशैली' या विषयावर एक प्रेरणादायी जनजागृती कार्यक्रम यशस्वीरित्या पार पडला.

३ महाराष्ट्र गर्ल्स बटालियन एनसीसी, नागपूर चे कमांडिंग ऑफिसर, कर्नल राजीव भोला, व ॲडम ऑफिसर मेजर ममता शंकर यांच्या मार्गदर्शन व सुचनेनुसार पार पडला. कार्यक्रमाचे समन्वयक म्हणून कॅप्टन कुलजीत कौर गिल, एनसीसी अधिकारी, यांनी भूमिका पार पाडली. या कार्यक्रमांतर्गत 'पोस्टर स्पर्धा' आणि 'बेस्ट फ्रॉम वेस्ट' स्पर्धेचे आयोजन करण्यात आले, ज्यामध्ये विद्यार्थ्यांनी पर्यावरणासंबंधी कल्पनांचे सुंदर सादरीकरण केले. या वेळी डॉ. अरविंद मुंगोले, सहाय्यक प्राध्यापक, वनस्पतीशास्त्र विभाग यांनी 'मिशन लाइफमधील युवकांची भूमिका' या विषयावर मार्गदर्शन करत विद्यार्थ्यांना पर्यावरणस्नेही सवयी अंगीकारण्याची प्रेरणा दिली.

या उपक्रमात एकूण ४२ कॅडेट्सनी उत्स्फूर्त सहभाग घेतला आणि पर्यावरण रक्षणाबाबतची बांधिलकी प्रदर्शित केली. कार्यक्रमामध्ये युवकांच्या नेतृत्वातून जीवनशैलीतील सकारात्मक बदलांद्वारे हवामान बदलाशी लढा देण्याचे महत्व अधोरेखित करण्यात आले. 'मिशन लाइफ' ही भारत सरकारची पुढाकार असलेली मोहिम असून, जागरूक निवडी व समुदायाच्या सहभागातून स्वच्छ, हरित व शाश्वत भविष्यासाठी काम करण्याचा संदेश या कार्यक्रमातून दिला गेला.

# ज्ञानज्योती सावित्रीमाई फुले सार्व. वाचनालय जन्मगावाला समर्पित



ब्रम्हपुरी/का.प्र.

लावारी (लोहारा) ता. चिमुर जि. चंद्रपुर या आपल्या जन्मगावी शिक्षणाची पुढची पिढी उच्चपदस्थ, प्रशासकीय अधिकारी व ज्ञानी व्हावी या उद्देशाने प्राचार्य डॉ. एन.एस.कोकोडे आणि प्रा डॉ. माधुरी कोकोडे यांच्या योगदानातून आणि गावातील विद्यार्थी, तरूण व गावकरी यांच्या साथीने सुसज्ज असे 'ज्ञानज्योती सावित्रीमाई फुले सार्वजनिक वाचनालय' उभे केले. ग्रंथालयात विविध स्पर्धा परीक्षेसाठी लागणारी पुस्तके, थोर महात्मांचे चरित्र, वाचनीय पुस्तके, रोजगार समाचार, दैनिक वृत्तपत्रे इत्यादी साहित्य ठेवण्यात आले व सदर ग्रंथालय व वाचनालय आपल्या जन्मगावला दि.१४जून २०२५ रोजी एका खास कार्यक्रमाद्वारे समर्पित करण्यात आले.

कार्यक्रमाच्या अध्यक्ष स्थानी प्राचार्य डॉ. देविदास जगनाडे होते तर उद्घाटन श्रीमान संजय नाथे, संचालक नाथे पब्लिकेशन नागपुर यांचे हस्ते पार पडले. याप्रसंगी सरपंच संध्याताई राऊत, पोलीस पाटील ए. एच.वाढई, प्रा. नामदेवराव जेंगठे, उद्धवराव साबळे, प्रा.मिलिंद सुपले, अशोक शेंडे, प्रा. पंकज बेंदेवार यांचे प्रमुख उपस्थित वाचनालयाचे उद्घाटन उत्साहात संपन्न झाले. या प्रसंगी सर्व मान्यवर पाहुण्यांचा सत्कार करण्यात आले व त्यांनी गावातील सर्व विद्यार्थ्यांना व ग्रामस्थांना अतिशय मोलाचे मार्गदर्शन केले. तसेच जि. प.शाळा, लावारी (लोहारा) येथील मुख्याध्यापक डी.एस. पिसे यांचा सेवानिवृत्तीपर सपत्नीक जाहीर सत्कार करण्यात आला. याचबरोबर जवाहर नवोदय विद्यालयात प्रवेशित झालेल्या

(उर्वरित पान क्र. ६ वर)

# अऱ्हेर-नवरगांवात चालतो लाखोंचा जुगार

ब्रह्मपुरी/प्रतिनिधी

ब्रह्मपुरी तालुक्यात अवैध धंद्यांना उत आले आहे. यात चोऱ्या, अवैध रेती तस्करी, मटकासह जुगारही मोठ्या प्रमाणात सुरू आहे. त्यामुळे गुन्हेगारीच्या प्रमाणात वाढ होत आहे. ब्रह्मपुरी तालुक्यातील अऱ्हेर नवरगाव येथे लाखोंचा जुगार भरत असल्याचे कळते. गावातील अनेक ठिकाणी हा जुगार भरत असल्यामुळे याचा नाहक त्रास सर्वसामान्य नागरिकांना होत आहे.

ब्रह्मपुरी पासून हाकेच्या अंतरावर असलेल्या अऱ्हेर नवरगावात मोठ्या प्रमाणात जुगाराचा खेळ चालत असून सदर जुगारात लाखोंची उलाढाल होत असल्याचे लोक चर्चेवरून कळते. त्यामुळे कायद्याचे राज्य आहे किंवा नाही अशी परिस्थिती दाखविणारे चित्र गावात सुरू असलेल्या जुगार खेळाच्या वेगवेगळ्या ठिकाणावरून आढळून येते. सदर जुगार हा कधी गावातील बाजार चौकातील दुकानामागे, तर कधी झाडाझुडपाच्या आश्रयाने, तर कधी नदीच्या किनारी तर कधी नदीकडे जाणाऱ्या नाल्या जवळ भरविला जात असून आठ ते दहा जणांचा घोळका करून बसल्याचे दिसून येतात.

इथे जुगार खेळण्यासाठी तालुक्यातून व शहरातून अनेक जण येतात. जुगार खेळणाऱ्यांची संख्या मोठी असल्याने या जुगार अड्डयावर लाखोंची उलाढाल होत असते. या जुगार अड्डयामुळे परिसरातील अनेक कुटुंबे उध्वस्त होण्याची शक्यता आहे. हा जुगार अड्डा सुरू राहिल्यास जुगार खेळणारे अनेक जण कर्जबाजारी होऊन त्यांच्यासमोर आत्महत्या करण्याशिवाय दुसरा पर्याय उरणार नाही. अऱ्हेर नवरगावात मोठ्या प्रमाणात जुगार चालत असून येथे पोलीस कारवाया मात्र अत्यल्प आहेत. जुगार अड्डे चालविणाऱ्याला पोलिसांच्या कठोर कारवाईची भीती नसल्याने हा जुगार भरवित असल्याचे गावकऱ्यांचे म्हणणे आहे. जुगार खेळण्यासाठी सर्वात सुरक्षित गाव म्हणून अर्हेर नवरगावाला प्रसिद्धी मिळत आहे.

पोलीस अधून मधून जुगार अड्डयांवर कारवाईचा बडगा उभारल्याचा देखावा करतात, परंतु सर्व काही ठरल्याप्रमाणे होत असल्याने पोलीस छाप्यांतून किरकोळ रक्कम जप्त करीत प्याद्यांवर कारवाई करण्यात येते. मात्र जुगार अड्डा चालविणारा मुख्य आरोपी मोकळाच राहत असल्याचे लोकचर्चेवरून चर्चिले जात आहे.

### ... QUOTES ...

**"Confidence doesn't come when you have all the answers. But it comes when you are ready to face all the questions."**
**- Dr. APJ Abdul Kalam**

### चारोळी

दुर्बल-आळशी मनात
शक्तिशाली विचार कसे येणार...
आजीबाईच्या बटव्यात,
'एड्स'चे औषध कसे सापडणार...

रचनाकार : डॉ. राजन जयस्वाल

N.B.H. Education Society's

**NEVJABAI HITKARINI COLLEGE**

BRAMHAPURI, DISTT. CHANDRAPUR (Ph.No. 272033 & 273293) (M.S.)

(Estd. 1962 & NAAC Re-accredited "B++' Grade (CGPA 2.87)

## Walk-in-Interview for Contributory Lecturers

(For Non-Granted courses)

(On UG and PG Level) for Session 2025-26

The Qualified candidates are hereby informed to attend the Walk-in-Interview on below date for the following post of teachers on Clock Hour Basis for UG & PG along with Marklists, Certificates and relevant documents.


| Subject | No.of Posts PG | No.of Posts UG | Date of Interview | Subject | No.of Posts PG | No.of Posts UG | Date of Interview |
|---|---|---|---|---|---|---|---|
| Physics | 8 | - | Dt. 27/06/2025 at 11.00 am | Marathi | 5 | - | Dt. 28/06/2025 at 11.00 am |
| Mathematics | 8 | - | | English | 5 | - | |
| Chemistry | 9 | - | | Home Economics | 5 | 3 | |
| Zoology | 8 | - | | Geography | 5 | 3 | |
| Botany | 8 | - | | Pol. Science | 5 | 3 | |
| Computer Science | 6 | 6 | | Economics | 5 | 3 | |
| Micro-biology | - | 4 | | History | 5 | 3 | |
| Commerce (Eng.) | 3 | 4 | | Sociology | 5 | 3 | |
| | | | | Library Science | 7 | - | |

**ADMISSION OPEN**

- B.A. I, II, III (Eng., Mar., Mlt, Elt, His., Geo., H.Eco., Soc., Pol.Sci., Economics.)
- B.Sc. I, II, III (Physics, Chemistry, Maths, Zoology, Botany, Electronics, Computer Science, Microbiology)
- B.Com. I, II, III (Marathi & English Medium)
- M.Com. I, II (Marathi & English Medium)
- M.Sc. I, II (Zoology, Physics, Chemistry, Botany, Mathematics & Computer Science)
- M.A. I, II (Geography, Home Eco., Pol.Sci., Economics, Marathi, English, Sociology, History)
- B.Lib. & I.Science, M.Lib. & I.Science
- Ph.D. Research Center (Physics, Geography, Marathi, English, Commerce, Chemistry)

Smt. Snehalatabai K. Bhaiya, President — Shri. Ashok K. Bhaiya, Secretary — Dr. S.M. Shekokar, Off. Principal

Miracle constructions & Developers



श्रीराम नगरी - डेव्हलपर्स

NATP प्लॉट्स उपलब्ध

- सिंदेवाही
- नवरगांव
- तळोधी
- चंद्रपुर (चौराळा)

संपर्क : अनिल दोनाडकर

मो. 8806776699, 9834946501

डुप्लेक्स बांधकाम करून मिळेल.

प्रो.प्रा. सुरेश सोरते

मो. 8698323337

सोरते स्टेनलेस स्टील वर्क्स

(पान क्र. १ वरून)

गीत (तुरले) पेट्रोल पंपसमोर नागभीड रोड, ब्रम्हपुरी





रेलींग, ग्रिल व गेट

स्टिलचे नावे बनवून मिळेल.

# स्वातंत्र्याच्या ७७ वर्षानंतरही...

(पान क्र. १ वरून)

टाकला अन् शेवटी त्यांची हाक शासन दरबारी ऐकू गेली आणि चिखलगांव लाडज गावांना जोडणारा दुवा म्हणून पुल बांधकाम मंजूर झाला.

दोन वर्षाच्या कालावधी उलटून सुद्धा अद्यापही पुलाचे पूर्ण बांधकाम झाले नाही. त्यामुळे यंदाही लाडज-चिखलगांव येथील शेतकरी, ग्रामस्थ, शाळकरी मुले व रूग्णांना नदीपात्रातूनच जीवघेणा प्रवास करावा लागणार आहे.

लाडज चिखलगांव यांना जोडणारा दुवा म्हणून या पुलाच्या रस्त्याकडे पाहिले जात होते, परंतु पुलाच्या अपूर्ण कामामुळे अजूनही लाडज गावाला जाण्याकरीता रस्ता नसल्याचे अधोरेखित झाले आहे. त्यामुळे पुलाचे अपूर्णावस्थेतील बांधकाम पूर्ण करावे, मागणी नागरिक करीत आहेत.

# ब्रम्हपुरी तालुक्यात तीव्र पाणी टंचाई

ब्रह्मपुरी/का.प्र.

ब्रम्हपुरी तालुक्यात पावसाळा सुरू होण्याआधीच अनेक गावांमध्ये तीव्र पाणीटंचाईची समस्या निर्माण झाली आहे. जून महिन्यातच अनेक ठिकाणी नळयोजनांचे वितरण ठप्प झाले असून, बरेचसे गाव जलस्त्रोतांच्या अडचणीत सापडले आहेत.

[illegible] ग्रामपंचायतींच्या नळयोजनांना अपुरा पाणीपुरवठा होत असल्यामुळे नागरिकांना दररोज पाण्यासाठी मोठी कसरत करावी लागत आहे. काही ठिकाणी नळधारा बंद पडल्यामुळे विहिरी



आणि हातपंप हाच एकमेव आधार राहिला आहे. मात्र, दुर्दैव असे की, अनेक हातपंप सध्या नादुरुस्त आहेत, तर विहिरी व बोअरवेलचा जलस्तर इतका घसरलेला आहे की, पाणी खेचणे अवघड झाले आहे.

गोसेखुर्द प्रकल्पामुळे नदीपात्रात पाण्याची पातळी मोठ्या प्रमाणात घटली आहे. याचा परिणाम म्हणून अगदी नदीकाठावर वसलेली गावे देखील पाणीटंचाईने ग्रस्त आहेत. कोलारी, पारडगाव, परसोडी इत्यादी नाल्यांच्या व नदीच्या काठावरील गावांमध्येही विहिरी व बोअरवेल कोरड्या पडल्या आहेत. पारंपरिक जलस्त्रोत निरुपयोगी ठरत असल्याने जनतेत असंतोष निर्माण होत आहे.

पाणीटंचाई ही केवळ नैसर्गिक नव्हे, तर व्यवस्थापकीय अक्षमतेचेही द्योतक आहे. प्रशासन आणि नागरिकांनी एकत्र येत या संकटावर तत्काळ आणि दीर्घकालीन उपाय केले नाही तर येत्या काळात गंभीर स्थिती निर्माण होईल.

## ज्ञानज्योती सावित्रीमाई...

(पान क्र. ५ वरून)

शाळेतील तीन गुणवंत विद्यार्थ्यांचासुद्धा सत्कार करण्यात आला.

सदर कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्राचार्य डॉ. एन.एस.कोकोडे यांनी केले. सूत्रसंचालन प्रा.डॉ. माधुरीताई कोकोडे यांनी केले. पाहुण्यांचे आभार डॉ. कु.ज्ञानदा कोकोडे (खेरडे) व स्नेहल कोकोडे यांनी मानले. यावेळी ग्रामवासी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## बाबासाहेब कहारे यांचे अकस्मात निधन



निधन वार्ता

ब्रम्हपुरी/का.प्र.

येथील एकात्मता शिक्षण संस्थेचे अध्यक्ष, रा. स्व. संघाचे बालपणापासून चे स्वयंसेवक, विहिप, गोरक्षा अभियानातील तसेच रामजन्मभूमी आंदोलनातील धडाडीचे कार्यकर्ते सेवानिवृत्त शिक्षक अरुण काशिराम कहारे याचे मंगळवार दि. १७ जूनला सकाळी ९ वाजता आकस्मिक निधन झाले. ते ब्रम्हपुरी परिसरात बाबासाहेब कहारे नावाने सुप्रसिध्द होते. त्यांच्या पश्चात एक मुलगा,एक मुलगी, नातवंडं व बराच मोठा आप्त परिवार आहे.

Lubi

बुधवार बंद

- दुकानाची वेळ - सकाळी १० ते सायं. ६ वा.

सी.आर.आय. मोटारपंपचे विदर्भातील प्रथम अधिकृत विक्रेता

गणेश ॲग्रीकल्चरल एजन्सी

रेल्वे स्टेशन रोड, खानोरकर भवन, भगतसिंग चौक, ब्रम्हपुरी

फोन नं. (07177) 272573 मोबाईल क्र. 9423115853, 7083214053

Kirloskar

CRI

ISO : 9001 : 2015 मानांकन प्राप्त दुकान

1994 पासून आपल्या सेवेत

किर्लोस्कर, एनसंस, लुबी, मोटार पंप, उषा, होन्डा, कॉमेट इंजीन, राज पी.व्ही.सी. पाईप, स्प्रिंकलर पाईप, आटा चक्की, हॅण्डपंप, केबल वायर व स्पेअर पार्टचे विक्रेता

Printed by Rajiv Pachpor published by Ashok Kisanlalji Bhaiya on behalf of Ashok Kisanlalji Bhaiya and printed at Aqua Process, Modi No.1, Sitabuldi, Nagpur and Published at Bramhapuri Samachar Office, Wadsa Road, Bramhapuri Editor Ashok Kisanlalji Bhaiya MAHMUL/2016/69789 Mob. 9422135404